तरुण भारत

# लोणावळ्यात पर्यटकांना आता लष्करी प्रशिक्षण

## संकटांच्या मुकाबल्यासाठी जिमी मिस्त्री यांचा पुढाकार



पुणे : डेला समूहाचे प्रमुख जिमी मिस्त्री यांनी राजमाची किल्ल्याजवळ उदेवाडी येथे शिरोता धरणाच्या काठावर तीन एकराच्या परिसरात डेटाच्या रुपाने पर्यटकांकरिता लष्करी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

प्रतिनिधी
लोणावळा

आजकाल दहशतवादी हल्ले कधी आणि कुठे होतील, याचा काही नेम नाही. त्यामुळे कायम सतर्क रहावे लागते. केवळ असे हल्लेच नव्हे, तर अनेकदा नैसर्गिक पूर, आगीच्या घटना अशा आकस्मिक संकटांशी सामना करण्याचीही वेळ येते. अशा प्रसंगी घाबरून न जाता स्वत:चा आणि इतरांचा बचाव कसा करायचा, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण प्रत्येकालाच मिळायला हवे. हीच निकड लक्षात घेऊन डेटा समूहाचे प्रमुख जिमी मिस्त्री यांनी राजमाची किल्ल्याजवळ उदेवाडी येथे शिरोता धरणाच्या काठावर तीन एकराच्या परिसरात डेटाच्या रुपाने या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पर्यटकांना लष्करी प्रशिक्षण देणारा देशातील हा पहिलाच उपक्रम आहे.

२६/११ ला मुंबईतील दहशतवादी हल्ल्यात शेकडो निरपराध लोक हुतात्मा झाले. त्यामुळे व्यथित झालेल्या जिमी मिस्त्री यांनी या घटनेचा सामना कसा करावा, याचे प्रशिक्षण नागरिकांना देण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. राष्ट्रीयत्वाची भावना जागी करण्याच्या उद्देशाने या तरुण उद्योजकाने हा उपक्रम हाती घेतला आहे. येथील प्रशिक्षण अधिक परिणामकारक आणि शास्त्रशुद्ध होण्याचे मुख्य कारण म्हणजे इथे उभी केलेली लष्करातील निवृत्त अधिकाऱ्यांची भक्कम फळी. लष्कराच्या सदर्न कमांडचे माजी प्रमुख निवृत्त लेफ्टनंट जनरल रेमंड नऱ्होना यांच्या नेतृत्वाखाली जवानांची तरुण तुकडी येथे प्रशिक्षण देते. प्रत्यक्ष दहशतवाद्यांचा खात्मा करणारे ब्लॅक कॅट कमांडोदेखील या तुकडीत आहेत. याअंतर्गत तोल सांभाळत पाईपवरून चालणे, भिंत ओलांडणे, क्रॉलिंग करत पुढे सरकणे, दोरीवर चढणे, दोरीच्या सहाय्याने तयार केलेला पूल ओलांडणे, आगीतून चालणे असे १९ प्रकारचे अडथळे पार करण्याचे प्रशिक्षण येथे दिले जाते. त्याचप्रमाणे अतिरेक्यांकडून अचानक गोळीबार झाल्यास गर्भगळित न होता स्वत:चा बचाव कसा करावा याचे तंत्रही येथे शिकविण्यात येते.

## संकल्पना प्रत्यक्षात आल्याचा आनंद

डेटाची संकल्पना प्रत्यक्षात आली, याचा मला विशेष आनंद आहे. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत त्या प्रसंगाला धीराने तोंड देण्यासाठी व त्यातून आपला व इतरांचा बचाव करण्यासाठी प्रत्येक पुरुष, महिला आणि मुलांना प्रशिक्षित करणे, हे आमचे उद्दिष्ट असल्याचे जिमी मिस्त्री यांनी सांगितले.